सकाळ

# ‘ईसीई इंडिया’चे आरोग्यसेवेत योगदान

## रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन ८० युवकांनी केले रक्तदान

सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. ११ : मध्य भारतातील एक अग्रगण्य सोलर पॅनेल निर्मिती प्रकल्प म्हणून ओळख असलेल्या ईसीई इंडिया एनर्जीज प्रा. लि. येथे संस्थेचे अध्यक्ष व संशोधक डॉ. व्ही. टी. इंगोले यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

हे शिबिर अमरावती मध्ये प्रसिद्ध असलेल्या संत गाडगे बाबा रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. ईसीई इंडियाच्या मार्फत नेहमीच विविध उपक्रम घेतले जातात.या उपक्रमामार्फत सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा कंपनीचा नेहमीच प्रयत्न असतो.



अमरावती: रक्तदान शिबिरात सहभागी डॉ. व्ही.टी. इंगोले, अमित आरोकर व अन्य मान्यवर तसेच युवक.

रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना मदत करण्यासाठी रक्त आवश्यक साठा असतो. परंतु केवळ ३ टक्के पात्र लोक दरवर्षी रक्तदान करतात. जे आपल्या देशासाठी पुरेसे नाही. त्यातच मे महिन्यात रक्ताचा प्रचंड तुटवडा असतो, याची जाणीव ठेवून हे शिबिर आयोजित करण्यात आले. या करिता संत गाडगेबाबा रक्तपेढीचे प्रकल्प संचालक सोपान गोडबोले यांनी कंपनीचे आभार मानले. कंपनीच्या मुलभूत मुल्या पैकी एक असलेल्या आरोग्य या अंतर्गत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ८० रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमात डॉ. व्ही. टी. इंगोले यांच्या अमृतमहोत्सवा निमित्त सपत्नीक अभीष्टचिंतन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रबंध संचालक अमित आरोकर, बाळासाहेब काळे, डॉ. अनिल कविमंडन प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. रोटरी क्लब ऑफ इंद्रपुरीचे अध्यक्ष सागर बुटे व सचिव मिलन शाह यांची सुद्धा विशेष उपस्थिती लाभली. यावेळी संचालक समीर काळे, अनिकेत तोंडारे, श्रीकांत तिरखिरे, सुरज गावंडे व सर्व सहकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.